भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ७६० / माहिती कक्ष / वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २१ / ११ / २०१६

१) ट्रक चालकांच्या निष्काळजीपणामुळे एकाचा जागीच मृत्यु व जखमी. :—

दिनांक २० / ११ / २०१६ रोजी १५.१५ वा. दर. यातील आरोपी ट्रक चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मोटार सायकल स्वार बबन सुरेश काटेखाये वय २४ वर्ष, रा. भेंडाळा यांचे मोटार सायकल क्र. एमएच ३६ एस ०२७५ ला दवडीपार शिवार स्मशान भुमी जवळ येथे धडक मारुन त्याचे मरणास कारणीभुत होवुन अपघाती सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी छगन सुरेश काटेखाये वय २७ वर्ष, रा. भेंडाळा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३०४(अ) भादंवि. १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बहादुरे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

२) जादु टोना करण्याच्या कारणावरुन अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली. :—

दिनांक १९ / ११ / २०१६ रोजी १८.०० वा. दर यातील दोनी आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस तु भुत लावलास मारोतीच्या मंदीरात पाणी उचल म्हणुन 'तु जादु खोर आहेस तु जादु केलास' असे बोलुन अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी आसाराम सिताराम गोंडाणे वय ६४ वर्ष, रा. पिलांद्री यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २९४,५०६,३४ भादंवि. सहकलम ३(२)२(१) ख,६ महाराष्ट्र जादु टोना कायदा सन २०१३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठाणे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

३) संगनमत करुन जादुटोण्याच्या कारणावरुन अश्लिल शब्दात शिविगाळ करुन मारण्या पिटण्याची धमकी दिली. :—

दिनांक १९ / ११ / २०१६ रोजी १८.३० वा. दर यातील फिर्यादीने आरोपी क्र. १ ला तु माझ्या सुनेला 'जादु टोना केला आहेस तो ओढुन टाक' असे हटकले या कारणावरुन आरोपी क्र. १ ते ०४ ने संगनमत करुन फिर्यादीला तु असे आरोप का लावले असे म्हणुन अश्लिल शब्दात शिविगाळ करुन थापड बुक्यांनी मारपीट केले व फिर्यादीचा मुलगा व सुन यांनासुध्दा मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २९४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठाणे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—

दिनांक २० / ११ / २०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ९१ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०६ केसेस, अवैध प्रवासी ०१ व ईतर वाहनांवरती ८४ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.